भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८५

(१९८५ चा अधिनियम क्रमांक ८२)

[१ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The Inland Waterways Authority of India Act, 1985

(Act No. 82 of 1985)

[*As in force on the 1st March 1998*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९९

[ किंमत : ४ रुपये ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि इनलँड वॉटरवेज ॲथॉरीटी ऑफ इंडिया ॲक्ट, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक १ दिनांक ८ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ ३ ते १२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ८ ऑक्टोबर १९९८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Inland Waterways Authority of India Act, 1985 as on the 1st March, 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in **Gazette of India,** Extraordinary Part XII, Section 1, No. 1 Vol. 9, dated 8th October 1998 on pages 3 to 12.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Martahi.

New Delhi :
dated the 8th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८५

कलमांचा क्रम

## प्रकरण एक

### प्रारंभिक

कलमे


१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.

२. व्याख्या.


## प्रकरण दोन

### भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण


३. भारताच्या अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाची घटना आणि निगमन.

४. सदस्यांच्या सेवाशर्ती.

५. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या शक्ती.

६. सदस्यांना पदावरून दूर करणे, इत्यादी.

७. रिकामे पद इत्यादीमुळे प्राधिकरणाची कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

८. सचिव आणि अन्य अधिकारी.

९. सल्लागार समित्या.

१०. प्राधिकरणाने धंद्याच्या तत्त्वानुसार काम करणे.


## प्रकरण तीन

### संपत्ती आणि संविदा


११. केंद्र शासनाच्या मत्ता आणि दायित्वे यांचे प्राधिकरणाकडे हस्तांतरण.

१२. प्राधिकरणाद्वारे संविदा.

१३. प्राधिकरणाच्यावतीने संविदा करण्याची पद्धती.


## प्रकरण चार

### प्राधिकरणाची कामे व शक्ती


१४. प्राधिकरणाची कामे.

१५. योजनांचे विशोधन.

१६. निरसित.


## प्रकरण पाच

### वित्त, लेखा व लेखापरीक्षा


१७ शुल्क व आकार यांची आकारणी व वसुली.

१८. केंद्र शासनाकडून अनुदाने व कर्जे.

१९. निधीची स्थापना.

२०. अर्थसंकल्प.

२१. निधींची गुंतवणूक.

२२. वार्षिक अहवाल.

२३. लेखा व लेखापरीक्षा.

२४. वार्षिक अहवाल आणि लेखा परीक्षकांचा अहवाल संसदेसमोर ठेवणे.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

२५. निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.

२६. प्राधिकरणाकरिता जमिनीचे आवश्यक संपादन.

२७. विवक्षित कायद्यांची प्रयुक्ती इत्यादी.

२८. प्रवेश करण्याची शक्ती.

२९. शक्तींचे प्रत्यायोजन.

३०. प्राधिकरणाचे आदेश व इतर लेख यांचे अभिप्रमाणन.

३१. प्राधिकरणाचे सदस्य अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.

३२. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

३३. केंद्र शासनाची प्राधिकरण निष्प्रभावित करण्याची शक्ती.

३४. नियम करण्याची शक्ती.

३५. विनियम करण्याची शक्ती.

३६. नियम आणि विनियमन संसदेपुढे ठेवणे.

३७. अडचणी दूर करण्याची शक्ती.

३८. १९८२ चा अधिनियम ४९ याचे विशोधन.

# भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८५

**(१९८५ चा अधिनियम क्रमांक ८२)**

(१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[३० डिसेंबर, १९८५]

नौभरण आणि नौवहन याच्या प्रयोजनार्थ, अंतर्देशीय जलमार्गाचे विनियमन आणि विकास करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकरणे घटित करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या छत्तीसाव्या वर्षी संसदेकडून पुढील प्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८५ असे म्हणता यईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास* **अंमलात येईल.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास :— व्याख्या.

(क) "अनुलग्न भूमी" याचा अर्थ, राष्ट्रीय जलमार्गाशी अनुलग्न असलेली सर्व भूमी, मग ती सीमांकित केलेली असो वा नसो, असा आहे;

(ख) "प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेले, भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, असा आहे;

(ग) "कालवा" याचा अर्थ, कोणताही जलमार्ग—मग तो नैसर्गिक किंवा कृत्रिम असो—असा **आहे;**

(घ) "संधारण" यात कालव्यातील गाळउपसणी, त्याचा प्रवाह वळवणे, तो बंद करणे, त्याचा फाटा काढणे किंवा त्याचे उत्सर्ग समाविष्ट आहेत;

(ङ) "संधारणाच्या उपाययोजना" याचा अर्थ, साफसफाई प्रयोजनांसाठी उपाययोजना, असा आहे. मात्र, त्यात पुरांपासून किनाऱ्यांचे संरक्षण करण्याच्या किंवा मुख्यतः नौभरण आणि नौवहन, यांच्याशी संबंधित नसलेल्या कोणत्याही कारणांमुळे ज्यांचे संरक्षण झालेले आहे अशा किनाऱ्यांवर निर्बंध घालण्याच्या उपाययोजनांचा समावेश नाही ;

(च) "पायाभूत संरचना" यामध्ये गोदी, धक्के, लहान धक्के, जहाजी माल उतरविण्याचे टप्पे, जलबंध, बोया (समुद्रामध्ये खडक दाखविण्याकरिता पाण्यावर तरंगणारे शंकु), अंतर्देशीय बंदरे, जहाजी माल हाताळण्याची सामग्री, रस्ते आणि लोहमार्ग यांचे पोचमार्ग आणि जहाजी माल साठविण्याच्या जागा (कोठारे) यासारख्या सोयी समाविष्ट आहेत, आणि त्यानुसार "पायाभूत संरचना" शब्दप्रयोगाचा अर्थ लावण्यात येईल;

(छ) "सदस्य" याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेला प्राधिकरणाचा सदस्य, असा आहे ;

(ज) "राष्ट्रीय जलमार्ग" याचा अर्थ, राष्ट्रीय जलमार्ग (गंगा-भागीरथी हुगळी नदीचा अलाहाबाद हलदीया पट्टा) अधिनियम, १९८२ (१९८२ चा अधिनियम ४९) याच्या कलम २ द्वारे राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित केलेला अंतर्देशीय जलमार्ग, असा आहे.

**स्पष्टीकरण.**—संसदेने कायद्याद्वारे अन्य कोणताही जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग असल्याचे घोषित केल्यास, अशी घोषणा झाल्याच्या दिनांकापासून असा अन्य जलमार्ग—

(एक) या खंडाच्या अर्थांतर्गत राष्ट्रीय जलमार्ग असल्याचे मानण्यात येईल; आणि

(दोन) या अधिनियमाचे उपबंध हे, आवश्यक त्या आपरिवर्तनांसह या अधिनियमाच्या प्रारंभासंबंधीच्या कोणत्याही निर्देशांचा अर्थ, उपरोक्त तारखेसंबंधीचा निर्देश आहे असा लावण्यासाठी केलेल्या आपरिवर्तनांसह अशा राष्ट्रीय जलमार्गाला लागू होतील ;

(झ) "नाव्य जलसरणी" याचा अर्थ, संपूर्ण वर्षभर किंवा वर्षाच्या काही भागात नाव्य **असलेला** कालवा, असा आहे ;

---

*दिनांक २७ ऑक्टोबर, १९८६, पहा : स्थायी आदेश क्र. ७६३ (ई) भाग दोन, उपविभाग ३, **दिनांक २७ ऑक्टोबर, १९८६.**

(ञ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या, नियमाद्वारे विहित केलेले असा आहे ;

(ट) "विनियम" याचा अर्थ, प्राधिकरणाने या अधिनियमान्वये केलेले विनियम, असा आहे;

(ठ) "नियम" याचा अर्थ, केंद्र शासनाने या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

## प्रकरण दोन

## भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण

भारताच्या अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाची घटना आणि निगमन.

३. (१) केंद्र शासन, योबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण या नावाने संबोधण्यात येणारे एक प्राधिकरण घटित करण्यात येईल.

(२) प्राधिकरण पूर्वोक्त नावाने शाश्वत उत्तराधिकार आणि जंगम आणि स्थावर, दोन्ही संपत्ती प्राप्त करणे, धारण करणे आणि तिचा विनियोग करणे यासाठी आणि संविदा करण्याकरिता या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने शक्तींसह सामान्य मुद्रा असलेला निगम निकाय असेल आणि तो उक्त नावाने दावा लावील आणि त्याच्यावर दावा लावण्यात येईल.

(३) प्राधिकरण पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

केंद्र शासनाने नियुक्त करावयाचा ;

(क) अध्यक्ष;

(ख) उपाध्यक्ष; आणि

(ग) पाचपेक्षा अधिक नाहीत इतक्या व्यक्ती.

(४) प्राधिकरण या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या अनुपालनार्थ, जिची मदत किंवा सल्ला घेणे इष्ट वाटेल त्या कोणत्याही व्यक्तीशी विनियमाद्वारे ठरविण्यात येईल अशा रीतीने सहयोग साधेल आणि अशा प्रकारे सहयोगी असलेल्या व्यक्तीला, ज्या प्रयोजनार्थ तिला सहयोगी करून घेण्यात आले असेल त्याच्याशी संबद्ध अशा प्राधिकरणाच्या चर्चेत भाग घेण्याचा अधिकार राहील परंतु मत देण्यास ती हक्कदार असणार नाही.

सदस्यांच्या सेवाशर्ती.

४. सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्या अन्य सेवाशर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे राहतील.

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या शक्ती.

५. (१) प्राधिकरणाचा अध्यक्ष प्राधिकरणाच्या सभेचे अध्यक्षपद स्वीकारण्याव्यतिरिक्त, प्राधिकरणाकडून प्रत्यायुक्त करण्यात येतील अशा, प्राधिकरणाच्या शक्तींचा वापर करील आणि कर्तव्ये पार पाडील आणि विहित करण्यात येतील अशा अन्य शक्तींचा वापर करील आणि कर्तव्ये पार पाडील.

(२) प्राधिकरणाचा उपाध्यक्ष विहित करण्यात येतील किंवा प्राधिकरणाकडून प्रत्यायुक्त करण्यात येतील अशा अध्यक्षांच्या शक्तींचा वापर करील आणि कर्तव्ये पार पाडील.

सदस्यांना पदावरून दूर करणे इत्यादी.

६. (१) केंद्र शासन त्याच्या मते—

(क) कृती करण्यास ज्याने नकार दिला आहे,

(ख) कृती करण्यास जो असमर्थ ठरलेला आहे,

(ग) आपल्या पदाचा गैरवापर केल्यामुळे त्याचे पदावर राहणे लोकहितास अपायकारक ठरले आहे, किंवा

(घ) अन्यथा सदस्य म्हणून पदावर राहण्यास अयोग्य आहे अशा कोणत्याही सदस्यास प्राधिकरणावरून काढून टाकू शकेल.

(२) केंद्र शासन, कोणत्याही सदस्याला त्याच्याविरुद्ध चौकशी प्रलंबित असे तो पर्यंत निलंबित करू शकेल.

(३) संबंधित सदस्याला केंद्र शासनाकडे त्याचे स्पष्टीकरण सादर करण्याची संधी दिल्याशिवाय या कलमाखाली बडतर्फीचा कोणताही आदेश देता येणार नाही आणि असा आदेश दिल्यानंतर बडतर्फ केलेल्या सदस्यांची जागा रिक्त म्हणून घोषित करण्यात येईल.

(४) ज्याला या कलमाखाली बडतर्फ करण्यात आले आहे असा सदस्य प्राधिकरणाखाली सदस्य किंवा कोणत्याही नात्याने फेर नियुक्तीसाठी पात्र समजला जाणार नाही.

रिकामे पद इत्यादीमुळे प्राधिकरणाची कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

७. प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ पुढील कारणांसाठी विधिअग्राह्य ठरणार नाही—

(क) प्राधिकरणातील कोणतेही रिकामे पद किंवा प्राधिकरणाच्या रचनेतील कोणताही दोष; किंवा

(ख) प्राधिकरणाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीतील कोणताही दोष; किंवा

(ग्) प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम न करणारी कोणतीही अनियमितता.

८. (१) प्राधिकरण, या अधिनियमाखालील त्याची कामे कार्यक्षमरीत्या पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल त्यानुसार सचिव आणि असे अन्य अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करू शकेल. **सचिव आणि अन्य अधिकारी.**

(२) प्राधिकरणाचा सचिव आणि अन्य अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विनियमाद्वारे ठरविण्यात येतील अशा असतील.

९. (१) वेळोवेळी या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, प्राधिकरण त्याची कामे कार्यक्षमरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा सल्लागार समित्या घटित करू शकेल. **सल्लागार समित्या.**

(२) प्रत्येक सल्लागार समिती नौभरण आणि नौवहन आणि संलग्न क्षेत्रे यांच्याशी संबंधित अशा प्राधिकरणाला योग्य वाटेल तितक्या व्यक्तींची मिळून बनलेली असेल.

१०. प्राधिकरण, या अधिनियमाखाली त्याची कामे पार पाडताना शक्य होईल तितपत धंद्याच्या तत्त्वानुसार ती करील. **प्राधिकरणाने धंद्याच्या तत्त्वानुसार काम करणे.**

## प्रकरण तीन

### संपत्ती आणि संविदा

११. (१) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिवसांपासून,— **केंद्र शासनाच्या मत्ता आणि दायित्वे यांचे प्राधिकरणाकडे हस्तांतरण.**

(क्) अंतर्देशीय जलमार्ग परिवहन संचालनालयाच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासनाकडे निहित असलेली आणि मुख्य अभियंता-नि-प्रशासक, अंतर्देशीय जलमार्ग परिवहन संचालनालय याने प्रशासित केलेली सर्व संपत्ती व अन्य मत्ता, अशा दिवसांच्या लगतपूर्वी प्राधिकरणाकडे निहित होतील;

(ख्) अशा दिवसांच्या लगतपूर्वी केंद्र शासनाने, केंद्र शासनाबरोबर किंवा केंद्र शासनासाठी, अंतर्देशीय जलमार्ग परिवहन संचालनालयाच्या प्रयोजनार्थ किंवा प्रयोजनाशी संबंधित घेतलेले सर्व ऋण, आबंधने, आणि दायित्वे, केलेल्या सर्व संविदा आणि करावयाच्या ठरवलेल्या सर्व बाबी आणि गोष्टी ह्या प्राधिकरणाने, प्राधिकरणाबरोबर किंवा प्राधिकरणासाठी केल्याचे, करण्यात आल्याचे आणि ठरवण्यात आल्याचे मानण्यात येईल;

(ग्) केंद्र शासनाने अंतर्देशीय जलमार्ग परिवहन संचालनालयाच्या प्रयोजनार्थ किंवा प्रयोजनाच्या संबंधात अशा दिवसापर्यंत केलेला आणि केंद्र शासनाने भांडवल म्हणून घोषित केलेला सर्व अनावर्ती खर्च केंद्र शासन निर्धारित करील अशा अटींच्या आणि शर्तींच्या अधीनतेने, केंद्र शासनाने प्राधिकरणाला पुरवलेले भांडवल असल्याचे समजण्यात येईल;

(घ्) अशा दिवसाच्या लगतपूर्वी अंतर्देशीय जलमार्ग परिवहन संचालनालयाच्या संबंधात केंद्र शासनाला देय असलेली सर्व रक्कम प्राधिकरणाला देय असल्याचे मानण्यात येईल;

(ङ्) अंतर्देशीय जलमार्ग परिवहन संचालनालयाच्या संबंधातील कोणत्याही बाबीच्या संबंधात, अशा तारखेपूर्वी केंद्र शासन किंवा केंद्र शासनाविरुद्ध दाखल करण्यात आलेले जे दावे आणि इतर वैध कार्यवाही प्रलंबित असेल किंवा जे दावे इतर वैध कार्यवाही दाखल करणे शक्य होते असे सर्व दावे आणि इतर वैध कार्यवाही अशा तारखेस त्या नंतर प्राधिकरणाने किंवा प्राधिकरणा-विरुद्ध चालू ठेवण्यात किंवा दाखल करण्यात येतील आणि

(च्) अशा दिवसांपूर्वी, या प्राधिकरणाच्या या अधिनियमाखालील कामाशी संबंधित असतील अशा जलमार्ग परिवहन संचालनालयाच्या कामकाजासाठीच किंवा त्यासंबंधात, संपूर्णपणे किंवा मुख्यत्वे-करून केंद्र शासनाच्या अधीन असलेले कोणतेही पद धारण करणारा प्रत्येक कर्मचारी प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येईल. परंतु, प्राधिकरण घटित करण्यात आले नसते तर, पारिश्रमिक रजा, भविष्यनिर्वाह निधी, सेवानिवृत्ति किंवा इतर अंतिम लाभ यासंबंधीच्या ज्या अटींवर व शर्तींवर आणि जेवढ्या पदावधीसाठी त्याने पद धारण केले असते त्याच अटींवर व शर्तींवर व तेवढ्याच अवधीसाठी तो पद धारण करील आणि केंद्र शासनाने एकतर स्वत: होऊन किंवा प्राधिकरणाने विनंती केल्यावरून, अशा कर्मचाऱ्याला स्वत:च्या सेवेत परत बोलावून किंवा केंद्र शासनाच्या सहमतीने, प्राधिकरणाने अशा कर्मचाऱ्याला आपल्या नियमित सेवेत सामावून, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तो तसे करणे चालू ठेवील :

परंतु, अशा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या प्राधिकरणाकडील प्रतिनियुक्तीच्या कालावधीत, प्राधिकरण अशा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या बाबतीत केंद्र शासनाला, आदेशाद्वारे निश्चित करील त्याप्रमाणे त्याचे रजा वेतन, निवृत्तिवेतन आणि उपदान यासंबंधात केंद्र शासन अंशदान देईल :

परंतु, आणखी असे की, असा कोणी कर्मचारी, ज्याने, त्याला प्राधिकरणाच्या नियमित सेवेत सामावून घेण्याच्या प्राधिकरणाच्या प्रस्तावासंबंधात प्राधिकरणाचा नियमित कर्मचारी न होण्याचा त्याचा हेतू, प्राधिकरण यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा काळात कळवील, तर त्याला प्राधिकरण त्याच्या नियमित सेवेत सामावून घेणार नाही.

(२) या कलमाखाली केंद्र शासनाची कोणती संपत्ती, अधिकार किंवा दायित्वे प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहेत किंवा केंद्र शासनाच्या अखत्यारीखाली काम करणारे कोणते कर्मचारी प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानावयाचे आहेत, याविषयी काही विवाद किंवा शंका निर्माण झाल्यास, प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यावर केंद्र शासनाकडून अशा विवादावर किंवा शंकावर निर्णय घेण्यात येईल आणि केंद्र शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(३) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) यात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरणाने कोणत्याही कर्मचाऱ्याला या कलमाखाली त्याच्या नियमित सेवेत सामावून घेण्यामुळे अशा कर्मचाऱ्याला त्या अधिनियमाखाली किंवा अन्य कायद्याखाली कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही ; आणि कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण अशी कोणतीही हक्क मागणी दाखल करून घेणार नाही.

प्राधिकरणाद्वारे संविदा.

१२. कलम १३ च्या उपबंधाच्या अधीनतेने प्राधिकरण या अधिनियमाखालील त्यांची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही संविदा करण्यास आणि ती पार पाडण्यास सक्षम असेल.

प्राधिकरणाच्या वतीने संविदा करण्याची पद्धत.

१३. (१) प्राधिकरणाच्या वतीने करावयाची प्रत्येक संविदा, अध्यक्ष किंवा प्राधिकरणाकडून याबाबतीत सर्वसाधारणत: किंवा विशेषत: शक्ती प्रदान करण्यात येईल असा अन्य सदस्य किंवा असा अधिकारी याच्याकडून करण्यात येईल आणि विनियमात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी संविदा किंवा संविदाचे वर्ग यावर प्राधिकरणाची समाईक मुद्रा लावण्यात येईल :

परंतु, केंद्र शासन, आदेशाद्वारे वेळोवेळी याबाबतीत निश्चित करील त्या मूल्यापेक्षा किंवा रकमेपेक्षा अधिक मूल्य किंवा रक्कम असलेली संविदा, तिला प्राधिकरणाने पूर्वमान्यता दिल्याशिवाय करण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, स्थावर संपत्तीचे संपादन किंवा विक्री यासाठीची किंवा अशा सपत्तीच्या ३० वर्षापेक्षा जास्त मुदतीच्या भाडेपट्ट्यासाठीची अशी कोणतीही संविदा आणि केंद्र शासन, आदेशाद्वारे याबाबतीत वेळोवेळी निश्चित करील त्या मूल्यापेक्षा किंवा रकमेपेक्षा अधिक मूल्याची किंवा रकमेची अन्य कोणतीही संविदा तिला प्राधिकरणाने पूर्व मान्यता दिल्याशिवाय, करण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधाच्या अधीनतेने या अधिनियमान्वये ज्या स्वरूपात आणि ज्या रीतीने कोणतीही संविदा केली जाईल ते स्वरूप आणि रीत ही, विनियमाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) या अधिनियमाच्या उपबंधानुसार नसलेली कोणतीही संविदा आणि विनियम हे प्राधिकरणावर बंधनकारक असणार नाहीत.

## प्रकरण चार

### प्राधिकरणांची कामे व शक्ती

प्राधिकरणाची कामे.

१४. (१) प्राधिकरण पुढील कामे करू शकेल :—

(क) नौभरण आणि नौवहन यासाठी राष्ट्रीय जलमार्गाचा आणि लगतच्या किनारपट्टीचा विकास, परिवहन आणि अधिक चांगला उपयोग करण्यासाठी सर्वेक्षण आणि अन्वेषण करणे आणि या बाबतीत योजना तयार करणे ;

(ख) राष्ट्रीय जलमार्गासाठी पायाभूत सोयी करण्यासाठी तरतूद करणे किंवा त्या करण्यासाठी परवाना देणे ;

(ग) साफसफाईच्या उपाययोजना आणि नदीचा प्रवाह वळवण्याची कामे राबवणे व नौभरण आणि नौवहन यांची सुरक्षितता व सुविधा आणि राष्ट्रीय जलमार्गाची सुधारणा करण्यासाठी आवश्यक असे अन्य कार्य करणे ;

(घ) नौभरण आणि नौवहन, नाव्य कालव्याचे परिरक्षण, नदी नेलण नियमन आणि साफसफाईच्या उपाययोजना या गोष्टी सुरक्षितपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्यावर परिणाम होण्याचा संबंध असेल तेथवर, राष्ट्रीय जलमार्गाच्या पात्रातील किंवा पात्रातून आणि किनारपट्टीच्या प्रदेशातील किंवा प्रदेशातून केरकचरा फेकणे, केरकचरा ओतणे किंवा त्यामधून किंवा त्यातील पदार्थ बाहेर काढणे यासारख्या गोष्टींवर नियंत्रण ठेवणे ;

(ङ) ज्याबाबतीत अडथळा किंवा व्यत्यय हा कायदेशीर असेल किंवा असा अडथळा किंवा व्यत्यय बऱ्याच कालावधीपासून असल्यामुळे किंवा अन्यथा, कायदेशीर ठरला असेल त्याबाबतीत, असा अडथळा दूर करण्यामळे किंवा त्यात फेरफार केल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल अशा व्यक्तीला

भरपाई दिल्यानंतर, ज्यामुळे सुरक्षित नौवहन किंवा पायाभूत सोयी किंवा साफसफाईच्या उपाय-योजना यांची सुरक्षितता धोक्यात आली असेल असा, राष्ट्रीय जलमार्गातील व संलग्न भूमितील कोणताही अडथळा किंवा व्यत्यय दूर करणे किंवा त्यात फेरफार करणे;

(च्) राष्ट्रीय जलमार्गावरील नौवहन आणि वाहतूक (रस्ते वाहतुकीच्या नियमांसहित) यांच्या नियमनासाठी उपबंध करणे;

(छ) राष्ट्रीय जलमार्गावरील किंवा खालील, संरचनांचे बांधकाम किंवा त्यांमधील फेरफार यांचे विनियमन करणे;

(ज्) राष्ट्रीय जलमार्गाची नाव्य हवामान विषयक सूचना प्रसारित करणे;

(झ्) राष्ट्रीय जलमार्गावरील अंतर्देशीय जलपरिवहनाचा, परिवहनाच्या अन्य मार्गांशी समन्वय साधणे;

(ञ्) राष्ट्रीय जलमार्गावर मार्गदर्शक स्थापन करणे आणि त्याचे परिरक्षण करणे.

(२) प्राधिकरण पुढील गोष्टीही करू शकेल,—

(क्) अंतर्देशीय जल परिवहनाशी संबंधित बाबींवर केंद्र शासनाला सल्ला देणे;

(ख्) अंतर्देशीय जल परिवहनाचा, परिवहनाच्या अन्य साधनांशी समन्वय साधण्याच्या हेतूने परिवहन विषयक आवश्यकतांचा अभ्यास करणे;

(ग्) जलआलेखन सर्वेक्षण करणे आणि नद्यांचे नकाशे प्रसिद्ध करणे;

(घ्) अंतर्देशीय जल परिवहन विकासासाठी योजना तयार करण्यास आणि तिची अंमलबजावणी करण्यास परस्परांना मान्य होतील अशा अटींवर व शर्तींवर कोणत्याही राज्य शासनाला सहाय्य करणे;

(ङ्) नौभरण आणि नौवहन यांसाठी जलमार्गाने किंवा त्या संबंधीच्या इतर सोयींचे नियोजन व विकास यासंबंधात, भारतात व परदेशात, परस्परात मान्य होतील अशा अटींवर व शर्तींवर संयंत्रणा सेवांचा विकास करणे आणि अशा सेवा पुरवणे;

(च्) देशी होड्यांच्या यांत्रिकीकरणाच्या संकल्पचित्राचा विकास, दोरी लावून ओढण्याचे यंत्र, उतारविषयक आणि विरामस्थळ विषयक सुविधा, बंदराची स्थापना आणि सर्वेक्षण तंत्रासहित अंतर्देशिय जलपरिवहनाशी संबंधित बाबींचे संशोधन करणे;

(छ्) अंतर्देशीय जलपरिवहनाच्या वर्गीकरणासाठी मानके निर्धारित करणे;

(ज्) देशातील आणि देशाबाहेरील अंतर्देशीय जलपरिवहन कर्मचाऱ्यांसाठी तांत्रिक प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखणे; आणि

(झ्) या अधिनियमाचा उपबंध अंमलात आणण्याकरिता आवश्यक असतील अशी अन्य कामे पार पाडणे.

(३) पोटकलम (१) च्या खंड (ङ्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नुकसानभरपाईमुळे किंवा भरपाई संबंधात निर्माण झालेल्या कोणत्याही दाव्याचा निर्णय सार्वजनिक हितार्थ आवश्यक असलेल्या जमिनीच्या प्रकरणातील तत्सम वादाशी संबंधित कायद्यानुसार करण्यात येईल.

(४) पोटकलम (१) आणि (२) खालील कार्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकरणाने तयार केलेली, विहित करण्यात आलेल्या रकमेहून अधिक भांडवली खर्च अंतर्भूत असलेली प्रत्येक योजना केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(५) केंद्र शासन पोटकलम (४) अन्वये त्याच्याकडे सादर करण्यात आलेल्या योजनेस एकतर आपरिवर्तनाशिवाय किंवा त्याला आवश्यक वाटेल अशा आपरिवर्तनासहित मान्यता देऊ शकेल किंवा त्याला आवश्यक वाटेल अशा निदेशानुसार नवीन योजना तयार करण्याबाबत प्राधिकरणाला निदेश देऊन अस्वीकृत करू शकेल.

१५. प्राधिकरण, कलम १४ च्या पोटकलम (५) खाली मान्यता दिलेल्या योजनेत केंद्र शासनाच्या पूर्वसंमतीविना कोणताही महत्त्वपूर्ण बदल करणार नाही. केंद्र योजनांचे विशोधन.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "महत्त्वपूर्ण बदल" याचा अर्थ, योजनेवरील खर्चात वीस टक्क्यांहून वाढ होणे किंवा ज्यामुळे गुणोत्तरातील खर्चाच्या घटकांत एकतर वाढ होते किंवा वीस टक्क्यांहून अधिक रकमेने लाभाच्या घटकात घट होते असा, लाभांमध्ये आणि खर्चाच्या गुणोत्तरात बदल होणे, असा आहे.

१६. [प्रवासी भाडे आणि मालाची वाहणावळ यांचे कमाल आणि किमान दर पद्धती नियत करण्याची शक्ती] १९९४ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे निरसित. निरसित.

## प्रकरण पाच

## वित्त, लेखा व लेखापरीक्षा

शुल्क व आकार यांची आकारणी व वसुली.

१७. (१) प्राधिकरण, केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने, नौभरण व नौवहन, प्रवाशांसाठी सोयी आणि जलयाने, नांगरणे, जहाजी माल हाताळणे आणि जहाजी मालाची साठवण करणे यासंबंधीच्या सोयींसह पायाभूत सोयी यांच्या प्रयोजनार्थ राष्ट्रीय जलमार्गाच्या उपयोगासंबंधात सेवा किंवा सुविधा देण्याकरिता त्याबाबतीत विनियमांद्वारे ठरवून दिलेल्या दराने शुल्क आणि आकार यांची आकारणी करू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली आकारावयाचे शुल्क व आकार विनियमांद्वारे ठरविण्यात येईल त्या रीतीने वसूल करण्यात येतील.

केंद्र शासनाकडून अनुदाने व कर्जे.

१८. केंद्र शासन, संसदेने याबाबतीत कायद्याद्वारे केलेल्या रीतसर विनियोगानंतर त्या शासनाला आवश्यक वाटेल तितक्या रकमेची अनुदाने व कर्जे प्राधिकरणाला देऊ शकेल.

निधीची स्थापना.

१९. (१) भारताचा अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण निधी नावाचा एक निधी प्रस्थापित करण्यात येईल आणि त्यात—

(क) कलम १८ अन्वये केंद्र शासनाने प्राधिकरणाला दिलेली कोणतीही अनुदाने आणि कर्जे;

(ख) या अधिनियमाखाली प्राधिकरणास मिळणारे सर्व शुल्क व आकार;

(ग) केंद्र शासनाकडून ठरविण्यात येतील अशा अन्य मार्गांनी प्राधिकरणास मिळणाऱ्या सर्व रकमा;

जमा करण्यात येतील.

(२) पुढील बाबींवरील खर्च भागविण्यासाठी निधीचे उपयोजन करण्यात येईल :—

(क) प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी आणि अन्य कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि अन्य पारिश्रमिक;

(ख) प्राधिकरणाची कलम १४ खालील कार्ये पार पाडताना होणारा प्राधिकरणाचा खर्च;

(ग) या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेल्या उद्दिष्टांवर आणि प्रयोजनांवर होणारा खर्च.

अर्थसंकल्प.

२०. प्राधिकरण, प्रत्येक वित्तीय वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा वेळी, प्राधिकरणाचा अंदाजित जमा व खच दर्शविणारा पुढील वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प तयार करील आणि तो केंद्र शासनाकडे पाठवील.

निधींची गुंतवणक.

२१. प्राधिकरण, केंद्र शासनाच्या प्रतिभूतिमध्ये किंवा विहित करण्यात येईल अशा अन्य रीतीने आपला निधी (कोणत्याही राखीव निधीसकट) गुंतवू शकेल.

वार्षिक अहवाल.

२२. प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि प्रत्येक वित्तीय वर्षातील अशा वेळी, मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा पूर्ण वृत्तांत देणारा त्याचा वार्षिक अहवाल तयार करील व त्याची एक प्रत केंद्र शासनाला सादर करील.

लेखा व लेखापरीक्षा.

२३. प्राधिकरणाचा लेखा, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्याशी विचारविनिमय करून विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवण्यात येईल आणि त्याची लेखापरीक्षा करण्यात येईल आणि लेख्यांची लेखापरीक्षित प्रत आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल केंद्र शासनाकडे, विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी पाठवील.

वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षकांचा अहवाल संसदेसमोर ठेवणे.

२४. केंद्र शासन, वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षकांचा अहवाल, तो मिळाल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.

२५. (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी उपबंधांना बाध न येता, प्राधिकरण या अधिनियमाखालील त्याची कामे आणि कर्तव्ये पार पाडताना, केंद्र शासन, धोरणविषयक प्रश्नांच्या बाबतीत त्याला वेळोवेळी लेखी देईल, अशा निदेशांनी बद्ध असेल :

परंतु, प्राधिकरणाला व्यवहार्य होईल तितपत, या पोटकलमान्वये कोणताही आदेश दिला जाण्यापूर्वी त्याचे मत मांडण्याची संधी देण्यात येईल.

(२) एखादा प्रश्न हा धोरणविषयक प्रश्न आहे किंवा कसे याबाबतचा केंद्र शासनाचा निर्णय अंतिम राहील.

सोयी संबंधीच्या सुविधा कर

त्या

ला

त

प्राधिकरणाकरिता जमिनीचे आवश्यक संपादन.

२६. या अधिनियमाखालील कामे पार पाडण्याकरिता प्राधिकरणाला आवश्यक असलेली कोणतीही जमीन ही, सार्वजनिक प्रयोजनांसाठी आवश्यक असल्याचे मानण्यात येईल आणि अशी जमीन ही, भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) याच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर तत्सम कायद्याच्या उपबंधान्वये प्राधिकरणासाठी संपादन करण्यात येईल.

विवक्षित कायद्यांची, प्रयुक्ती, इत्यादी.

२७. (१) या अधिनियमाचे उपबंध हे, भारतीय बंदरे अधिनियम, १९०८ (१९०८ चा १५), मोठी बंदरे न्यास अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) याच्या उपबंधाशिवाय आणखी असतील आणि विशेषत: या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) भारतीय बंदरे अधिनियम, १९०८ (१९०८ चा १५) अन्वये कोणत्याही बंदर संरक्षकाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने; किंवा

(ख) मोठी बंदरे न्यास अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) अन्वये कोणत्याही मोठ्या बंदरांच्या न्यास मंडळाने किंवा कोणत्याही बंदराच्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने

अशा बंदराच्या किंवा मोठ्या बंदराच्या मर्यादेत येणाऱ्या अंतर्देशीय जलमार्गात (राष्ट्रीय जलमार्गासहित( किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतीही अधिकारिता, कार्ये, शक्ती किंवा कर्तव्ये यांचा वापर करताना, ती पूर्ण करताना किंवा ती बजावताना त्यावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही.

(२) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अंतर्देशीय जलयान अधिनियम, १९१७ (१९१७ चा १) किंवा इतर कोणताही केंद्रीय अधिनियम (भारतीय बंदरे अधिनियम, १९०८ आणि मोठी बंदरे न्यास अधिनियम, १९६३ या व्यतिरिक्त अन्य) किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले कोणतेही राज्य किंवा प्रांतिक अधिनियम यांच्या प्रवर्तनावर कोणत्याही राष्ट्रीय जलमार्गावरील नौभरण आणि नौवहन यासंबंधात परिणाम होणार नाही [1][परंतु, राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या अधीन असलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने अशा कोणत्याही अधिनियमान्वये वापरणे, पार पाडणे किंवा बजावणे आवश्यक असेल, अशी अधिकारिता, कामे, शक्ती व कर्तव्ये ही, नौभरण आणि नौवहन किंवा, असा राष्ट्रीय जलमार्ग याच्याशी, संबंधित असेल किंवा संबंधित असतील किंवा त्याच्याशी आनुषंगिक असतील अशा कोणत्याही बाबीशी किंवा त्याच्याशी अन्यप्रकारे संबद्ध असेल तेथवर, अशा प्रारंभानंतर प्राधिकरणाकडून बजावण्यात येतील, पार पाडण्यात येतील किंवा वापरण्यात येतील.]

प्रवेश करण्याची शक्ती.

२८. याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, प्राधिकरणाने याबाबतीत सर्वसाधारणपणे वा विशेष करून प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी तसे करणे आवश्यक असेल तेव्हा तेव्हा, सर्व वाजवी वेळी कोणत्याही जमिनीवर किंवा जागेवर प्रवेश करू शकेल, आणि

(क) कोणतेही निरीक्षण, सर्वेक्षण, मोजणी, मूल्यांकन किंवा चौकशी करू शकेल;

(ख) पातळीची मोजणी घेऊ शकेल;

(ग) अंतर्भूमीत खणू शकेल वा विधण काम करू शकेल;

(घ) बांधकामाच्या सीमा आणि उद्देशित मार्ग ठरवून घेऊ शकेल;

(ङ) खुणा करून आणि चर खणून अशी पातळी, सीमा आणि मार्ग यांच्या खुणा करू शकेल.

(च) विहित करण्यात येतील अशा इतर कृती किंवा गोष्टी करू शकेल:

परंतु, अशी कोणतीही व्यक्ती, अशा भोगवटादारास तसे करण्याचा त्याचा उद्देश असल्याबद्दलची किमान चोवीस तासांची लेखी पूर्व सूचना दिल्याशिवाय कोणत्याही इमारतीत किंवा राहत्या घराला जोडलेल्या कोणत्याही आवारात किंवा उद्यानात त्याच्या भोगवटा दाराच्या संमती शिवाय प्रवेश करू शकणार नाही.

शक्तींचे प्रत्यायोजन.

२९. प्राधिकरण, सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही असल्यास शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, या कलमाखालील त्याला योग्य वाटतील अशा (कलम ३५ खालील त्याच्या शक्ती वगळून) शक्ती व कामे सभापतीकडे किंवा इतर कोणत्याही सदस्याकडे किंवा अधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करू शकेल.

---

१. १९९४ चा अधिनियम ८, कलम .... द्वारे हा मजकूर गाळण्यात आला.

**प्राधिकरणाचे आदेश व इतर लेख यांचे अधिप्रमाणन.**

३०. प्राधिकरणाचे सर्व आदेश व निर्णय सभापतीच्या किंवा प्राधिकरण याबाबतीत प्राधिकृत करील अशा इतर कोणत्याही सदस्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील आणि प्राधिकरणाने निष्पादित केलेले इतर सर्व संलेख प्राधिकरण याबाबतीत प्राधिकृत करील अशा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

**प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.**

३१. प्राधिकरणाचे सर्व सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी हे जेव्हा या अधिनियमाच्या उपबंधानुसार कृती करीत असतील किंवा त्यांनी कृती करणे अभिप्रेत असेल तेव्हा, ते भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोक सेवक असल्याचे मानण्यात येतील.

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

३२. (१) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमान्वये किंवा विनियमांन्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल शासन किंवा शासनाचा कोणताही, अधिकारी किंवा प्राधिकरणाचा कोणताही सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध दावा, खटला किंवा वैध कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

(२) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमान्वये किंवा विनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीबद्दल प्राधिकरणाविरूद्ध किंवा प्राधिकरणाचा कोणताही सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल केली जाणार नाही आणि विशेषतः पुरामुळे किंवा बांधकाम भग्न झाल्यामुळे किंवा ते पूर्ण न झाल्यामुळे आवश्यक ठरतील अशा निवारक उपाययोजना करण्यासाठी तरतूद करण्याची जबाबदारी प्राधिकरणावर राहणार नाही.

**केंद्र शासनाची प्राधिकरण निष्प्रभावित करण्याची शक्ती.**

३३. (१) जर, कोणत्याही वेळी, केंद्र शासनाचे असे मत असेल की,—

(क) तीव्र आणीबाणीमुळे प्राधिकरण या अधिनियमाच्या उपबंधान्वये त्याच्यावर लादलेली कामे आणि कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ आहे ; किंवा

(ख) प्राधिकरणाने या अधिनियमान्वये केंद्र शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करताना किंवा या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा त्याद्वारे त्याच्यावर लादलेली कामे व कर्तव्ये पार पाडताना सतत कसूर केली आहे आणि अशा कसुरीच्या परिणामी प्राधिकरणाची किंवा कोणत्याही राष्ट्रीय जलमार्गाच्या प्रशासनाची वित्तीय स्थिती खालावलेली आहे ; किंवा

(ग) लोकहितार्थ तसे करणे त्यास आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात आहे तर केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीसाठी, प्राधिकरणास निष्प्रभावित करू शकेल ;

परंतु, खंड (ख) मध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी या पोटकलमान्वये अधिसूचना काढण्यापूर्वी केंद्र शासन प्राधिकरणास, ते निष्प्रभावित का केले जाऊ नये याचे कारण दाखविण्याची वाजवी संधी देईल आणि प्राधिकरणाची जर कोणतीही स्पष्टीकरणे आणि आक्षेप असतील तर ते विचारात घेईल.

(२) प्राधिकारणाला निष्प्रभावित करणारी पोटकलम (१) खालील अधिसूचना प्रकाशित झाल्यावर—

(क) सर्व सदस्य निष्प्रभावनाच्या तारखेपासून सदस्य म्हणून आपल्या पदाचा त्याग करतील;

(ख) या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा त्याद्वारे प्राधिकरणास किंवा त्याच्या वतीने ज्या शक्तींचा वापर करता येईल, किंवा कामे व कर्तव्ये पार पाडता येतील, त्या सर्व शक्तींचा वापर, पोट कलम (३) अन्वये प्राधिकरण पुनर्घटित होईपर्यंत, केंद्र शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून, करण्यात येईल, आणि ती कामे व कर्तव्ये पार पाडण्यात येतील ;

(ग) प्राधिकरणाच्या मालकीची किंवा त्याचे नियंत्रण जिच्यावर आहे अशी सर्व संपत्ती, ही पोट कलम (३) अन्वये प्राधिकरण पुनर्घटित होईतोपर्यंत, केंद्र शासनाकडे निहित होईल.

(३) पोटकलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावानाचा कालावधी समाप्त झाल्यावर, केंद्र शासन—

(क) निष्प्रभावनाचा कालावधी, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा आणखी मुदतीने वाढवू शकेल ;

(ख) नव्या नियुक्तीद्वारे प्राधिकरण पुनर्घटित करू शकेल आणि अशा बाबतीत, पोटकलम (२) च्या खंड (क) अन्वये जिचे पद रिक्त होईल अशी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी अनर्ह असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु, केंद्र शासन निष्प्रभावनाचा कालावधी–मग तो मूलत: पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केल्यानुसार असो किंवा या पोटकलमान्वये वाढविलेला असो–समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, या पोटकलमाच्या खंड (ख्) अन्वये कार्यवाही करू शकेल.

(४) केंद्र शासन, पोटकलम (१) अन्वये काढलेली अधिसूचना आणि या कलमान्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा आणि कार्यवाही करण्यास भाग पाडणारी परिस्थिती यासंबंधीचा संपूर्ण अहवाल सादर करण्यापूर्वी संसदेच्या सभागृहापुढे लवकरात लवकर मांडण्याची व्यवस्था करील.

३४. (१) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल. **नियम करण्याची शक्ती.**

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा—

(क्) कलम ४ अन्वये प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी व इतर सेवा शर्ती;

(ख्) कलम ५ अन्वये अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या शक्ती व कर्तव्ये;

(ग्) कलम ९ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या सल्लागार समितीसंबंधीच्या बाबी;

(घ्) कलम १४ च्या पोटकलम (४) अन्वये विहित करणे आवश्यक असलेली रक्कम;

(ङ्) कलम २० अन्वये प्राधिकरण आपला अर्थसंकल्प आणि कलम २२ अन्वये आपला वार्षिक अहवाल ज्या नमुन्यात व ज्या वेळी तयार करील तो नमुना व ती वेळ;

(च्) कलम २१ अन्वये प्राधिकरण, आपला निधी ज्या रीतीने गुंतवील ती रीत;

(छ्) कलम २३ अन्वये प्राधिकरणाचा लेखा ज्या रीतीने ठेवण्यात येईल आणि त्याची लेखापरीक्षा केली जाईल ती रीत;

(ज्) कलम २८ अन्वये प्रवेश करण्याच्या शक्तीचा वापर करण्याबाबतच्या अटी व निर्बंध आणि त्या कलमाच्या खंड (च्) मध्ये निर्देशिलेल्या बाबी; आणि

(झ्) नियमाद्वारे विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी किंवा जिच्यासंबंधात उपबंध करावयाचा किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

३५. (१) प्राधिकरण, केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने या अधिनियमाची प्रयोजने सर्वसाधारणपणे पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाशी आणि नियमांशी सुसंगत असे विनियम तयार करील; **विनियम करण्याची शक्ती.**

(२) विशेषत: आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा विनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी तरतूद करता येईल :—

(क्) कलम ३ च्या पोटकलम (४) अन्वये प्राधिकरण स्वत:ला एखाद्या व्यक्तीशी ज्या रीतीने व ज्या प्रयोजनासाठी सहयोगी करून घेईल ती रीत व ते प्रयोजन;

(ख्) कलम ८ च्या पोटकलम (२) अन्वये प्राधिकरणाचा सचिव व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती;

(ग्) ज्यावर प्राधिकरणाची सामाईक मुद्रा लावावयाची त्या संविदा किंवा संविदेचे वर्ग आणि प्राधिकरणाने ज्या नमुन्यात व ज्या रीतीने संविदा करावयाची तो नमुना व ती रीत;

(घ्) कलम १४ च्या पोटकलम (१) आणि (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात, ज्या रीतीने व ज्या शर्तींच्या अधीनतेने कोणतेही काम पार पाडता येईल ती रीत व त्या शर्ती;

(ङ्) राष्ट्रीय जलमार्गावरील रस्त्याचे नियम;

(च्) पायाभूत सोयी आणि पायाभूत सोयींचा अंतर्भाव असलेल्या सुविधा यांचा सुरक्षित, कार्यक्षम आणि सोईस्कर वापर, व्यवस्थापन आणि नियंत्रण;

(छ्) राष्ट्रीय जलमार्गावरून आणलेल्या मालाचा स्वीकार, त्याचे वहन, साठवणूक व तो हलवणे आणि असा माल उतरवून घेण्यापूर्वी तो खराब होणार असेल किंवा तो खराब झाला आहे असे अभिकथित केले असेल तेव्हा, असा माल ताब्यात घेण्याबाबत जी कार्यपद्धती अनुसरावयाची ती कार्यपद्धती;

(ज्) जलयानातून जेथे माल उतरवून घेण्यात येईल व पुढे पाठविण्यासाठी तो जलयानाच्या फळीवर चढविण्यात येईल, त्या गोद्या, धक्के, लहान धक्के आणि माल उतरविण्याचे टप्पे यांचे विनियमन करणे, ते जाहीर करणे व ते निश्चित करणे;

(झ्) राष्ट्रीय जलमार्गावरील जलयानांवर ज्या रीतीने व ज्या शर्तीअन्वये माल चढवण्यात येईल आणि माल उतरविण्यात येईल त्या रीतीचे व शर्तींचे विनियमन करणे;

(ञ्) गैरशिस्त व्यक्तींना किंवा अन्य नको असलेल्या व्यक्तींना आणि अपप्रवेशींना राष्ट्रीय जलमार्गातून वगळणे;

(३) पोटकलम (२) च्या खंड (ग) ते (न) पर्यंतच्या कोणत्याही खंडान्वये केलेल्या कोणत्याही विनियमात अशी तरतूद करता येईल की, त्याचे उल्लंघन केल्यास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल अशी दंडाची शिक्षा करण्यात येईल आणि असे उल्लंघन करण्याचे पुढे चालू राहिल्यास, अशा पहिल्या उल्लंघनाबाबतचा अपराध सिद्ध झाल्यानंतर असे उल्लंघन पुढे चालू राहिल्याच्या दर दिवसास वीस रुपयांपर्यंत असू शकेल अशा अधिक दंडाची शिक्षा करण्यात येईल.

नियम आणि विनियमन संसदेपुढे ठेवणे.

३६. या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम किंवा विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याची शक्ती.

३७. (१) या अधिनियमाचे उपबंध परिणामक करण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, केंद्र शासन, शासकीय राजपत्रात आदेश प्रकाशित करून त्याद्वारे अडचण दूर करण्यासाठी आवश्यक वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसतील असे उपबंध करू शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर या कलमाखाली कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(२) या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

१९८२ चा अधिनियम ४९ याचे विशोधन.

३८. राष्ट्रीय जलमार्ग (गंगा–भागीरथी–हुगळी नदीचा अलाहाबाद हलदीया पट्टा) अधिनियम, १९८२ यामध्ये,—

(क) कलम ३ मध्ये "केंद्र शासन" या शब्दाऐवजी "संघ" हा शब्द दाखल करण्यात येईल आणि "यापुढे उपबंधित केलेल्या मर्यादेपर्यंत" याऐवजी "भारताचे अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८५ यामध्ये उपबंधित केलेल्या मर्यादेपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) कलमे ४ ते १५ वगळण्यात येतील.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई